# वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अकोला यांचे न्यायालय.
## कनिष्ठ लिपीक पदाच्या मुलाखतीस पात्र उमेदवारांसाठी सुचना

अ) कनिष्ठ लिपीक पदासाठीच्या मुलाखतीसाठी पात्र एकूण १८० उमेदवारांपैकी क्रमांक ०१ ते ६० वरील उमेदवारांनी दिनांक १२.११.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नविन इमारत, ३रा माळा, दक्षिण बाजुकडील कक्ष क्रमांक A-3, जिल्हा न्यायालय, अकोला येथे कागदपत्र/प्रमाणपत्र पडताळणीसाठी तसेच मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

ब) तसेच, क्रमांक ६१ ते १२० वरील उमेदवारांनी दिनांक १३.११.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नविन इमारत, ३रा माळा, दक्षिण बाजुकडील कक्ष क्रमांक A-3, जिल्हा न्यायालय, अकोला येथे कागदपत्र/प्रमाणपत्र पडताळणीसाठी तसेच मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

क) त्याचप्रमाणे, क्रमांक १२१ ते १८० वरील उमेदवारांनी दिनांक १४.११.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नविन इमारत, ३रा माळा, दक्षिण बाजुकडील कक्ष क्रमांक A-3, जिल्हा न्यायालय, अकोला येथे कागदपत्र/प्रमाणपत्र पडताळणीसाठी तसेच मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

ड) मुलाखतीस पात्र उमेदवारांनी जाहीरात दिनांक ०४.१२.२०२३ मधील मुद्दा क्रमांक ५ (ग) [Point No. 5(o)] मध्ये नमूद खालील आवश्यक प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती व त्याचा साक्षांकित केलेला एक संच, प्रवेश पत्र (Hall Ticket) तसेच एक वैध फोटो परिचयपत्र इत्यादि कागदपत्रे पडताळणीच्या उद्देशाने सादर करणे आवश्यक आहे.

१. जन्मतारखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखला/माध्यमिक शाळा प्रमाणपत्र).
२. अर्हता परीक्षा/पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.
३. अर्हता परीक्षा/पदवी परीक्षा मध्ये मिळवलेल्या गुणांची गुणपत्रिका.
४. दोन सन्माननीय व्यक्तिंनी दिलेली चारित्र्य प्रमाणपत्रे, त्यांचे नांव, पदनाम आणि पूर्णटपाल पत्त्यासह, जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेस किंवा नंतर दिलेले, उमेदवाराचे नैतिक चारित्र चांगले असल्याचे प्रमाणित करणारे, जाहिराती बरोबर दिलेल्या विहित नमुन्यात दिलेले.
५. पात्रतेच्या निकषात नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठ/संस्थेने जारी केलेले संगणक संचालनातील विहित ज्ञानाविषयीचे प्रमाणपत्र.
६. पात्रता निकषात नमूद केल्याप्रमाणे शासकीय परीक्षा ब्युरो, महाराष्ट्र राज्य किंवा शासकीय मंडळ किंवा आय.टी.आय. ने जारी केलेले इंग्रजी व मराठी शॉर्टहॅंड/टायपिंगमधील आवश्यक गतीचे प्रमाणपत्र.
७. शासनाने विहित केलेल्या प्राधिका—याकडून निर्गमित केलेला जातीचा दाखला, जिथे लागू असेल तेथे.
८. उमेदवार राज्य/केंद्र सरकारच्या सेवेत असल्यास संबंधित विभागाकडून 'ना हरकत प्रमाणपत्र'
९. अनुभव प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे, असल्यास.

१०. विवाहित महिला उमेदवाराच्या बाबतीत, जर तिने लग्नानंतर आपले नाव बदलले असेल तर तिचे नांव बदलण्या संदर्भातीत कागदपत्रे, जसे की शासकीय राजपत्र/सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

११. इतर कोणतीही कागदपत्रे, जर जिल्हा न्यायालय आस्थापनेने मागितल्यास.

ड) उमेदवारांनी वर नमुद अनुक्रमांकानुसार साक्षांकीत कागदपत्रांचा संच लावून सोबत आणावा.

(राजेश एस. तिवारी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अकोला.

दिनांक १०.११.२०२४